# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३
## (सकाळी ०९.१५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**(अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्राचे दैवत असलेल्या खंडोबा व ज्योतिबा आणि इतर देवस्थाने हे लाखो भाविकांचे श्रध्दास्थाने असणे, या देवतांची पूजा ही भंडाराची आणि गुलालाची उधळण करत करणे, याकरिता पिवळया व लाल रंगाच्या घातक केमिकलचा वापर भंडारा व गुलालामध्ये करण्यात येणे, या भंडाऱ्यांची विक्री ही देवस्थानाच्या बाहेर करण्यात येत असून सदरचा भंडारा हा हळद समजून भंडाऱ्यांचा वापर पूजेला व अंगावर लावण्यासाठी करण्यात येणे, परंतु सदरचा भंडारा हा शरीरासाठी अपायकारक असून लाकडाच्या भुश्यामध्ये अत्यंत घातक अशी रसायने त्यामध्ये मिसळून पिवळा व लाल रंग आणण्यात येणे, सदरची रसायने ही कॅन्सरला आणि श्वसनाच्या रोगाला उद्युग्त करणारी असून यावरती तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता, भंडाऱ्याच्या जागेवर शेतकऱ्यांनी पिकविलेली खरी हळद वापरली तर हळदीच्या गुणधर्मानुसार सदर भक्तांच्या शरीरावर चांगला परिणाम होईल आणि शेतकऱ्यांच्या हळदीला एक चांगली बाजारपेठ मिळून शेतकऱ्यांना याचा फायदा होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील विभागांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात नाल्याचे रुंदीकरण व डी.पी.रोड रुंदीकरणामध्ये अनेक झोपडपट्टीधारक बाधीत झालेले असणे, सदर झोपड्या या सन २०११ च्या झोपडपट्टी नियमात (सशुल्क) पात्र असणे, सदर नियम २०११ च्या झोपडपट्टी धारकांना (एस.आर.ए.) लागू होत असणे, परंतू सदर प्रकल्पबाधीत सशुल्क पात्र

अप्रमाणित प्रत

झोपडीधारकांना त्यांची अनामत रक्कम किती याबाबत माहिती देण्यात आलेली नसणे, पंतप्रधान आवास योजनेतून किती रक्कम मिळणार, महाराष्ट्र शासनाकडून किती रक्कम देण्यात येणार व झोपडीधारकांकडून किती रक्कम अनामत घेण्यात येणार याबाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतलेला नसल्यामुळे उक्त बाधीत झोपडीधारक अद्यापही संभ्रमात असणे, मालाड येथील पोयसर नदी व डी.पी. रोड रुंदीकरणबाधीत झोपधीधारक हे पात्र असतांनीही केवळ शासनाने सशुल्क पात्रतेसाठीचे शुल्क निश्चित केले नसल्यामुळे सदर झोपडीधारक हक्काच्या घरपासून वंचित असणे, शासनाने यासंदर्भात तात्काळ निर्णय घेऊन मालाड येथील उक्त झोपडीधारकांना हक्काचे घरे देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(३) **श्री. बच्चू कडू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अचलपूर जिल्हा अमरावती येथील फिनले मिल कोविड १९ चे कारण देऊन सन २०२० पासून बंद असणे, मिल मधील कामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली असणे, राष्ट्रीय मिल मजदूर संघ व स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी वारंवार केंद्र व राज्य शासनास फिनले मिल सुरु करणे बाबत निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही हालचाल न होणे, फिनले मिलचे कामगार याबाबत वारंवार आक्रमक होत आंदोलन करीत असून कामगारांमध्ये मिल सुरू होत नसल्याने निर्माण झालेला प्रचंड असंतोष, मिल कामगारांच्या कुटुंबियांची मोठया प्रमाणात होत असलेली परवड, राज्य शासनाने याप्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून मिल तातडीने सुरू व्हावी यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता, मागील अधिवेशनात फिनले मिल, अचलपूर सुरु करणे बाबत शासनाद्वारे आश्वासन मिळणे, आश्वासनावर शासनाद्वारे आजपर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे फिनले मिल कामगारांत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **डॉ. राहूल आहेर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यभरात सार्वजनिक व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या रुग्णालयांत रुग्ण मृत झाल्यानंतर त्याला घरी अथवा स्मशानात नेण्याकरीता शववाहिनीचा वापर केला जाणे, परंतु राज्यभरात शववाहिन्यांचा प्रचंड तुटवडा भासत असणे, रुग्ण मृत झाल्यावर त्याचे नातेवाईक शववाहिन्या मिळत नसल्याने ॲम्ब्युलेन्स अथवा प्रायव्हेट गाडीने शव घेऊन जात असणे, परंतु यामुळे अनेकदा ट्राफिक पोलीस या ॲम्ब्युलेन्सला अथवा प्रायव्हेट

अग्रिम प्रत

गाड्यांना अडवून दंड वसुल करीत असणे, ॲम्ब्युलेन्सने शव वहन करण्यास परवानगी नसल्याने नातेवाईकांना अतिरिक्त भुर्दंड भरावे लागणे, राज्यभरात शववाहिन्यांची संख्या कमी असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असणे, शासनाने उक्त प्रकरणी तात्काळ निर्णय घेऊन ॲम्ब्युलेन्सद्वारे शव वहन करण्याकरीता परवानगी देण्याची आवश्यकता, यावर शासनाने घ्यावयाचा निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(५) **श्री. रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“भिवंडी शहरातील स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात ॲडमिट केलेल्या ९ महिन्यांच्या गर्भवती सविता दिनेश यादव यांचा रुग्णालयातील डॉक्टरांच्या व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी मृत्यू होणे, दिनांक १७ नोव्हेंबर रोजी नैसर्गिक बाळंतपणाची वाट न बघता चुकीच्या पद्धतीने सिजर केल्यामुळे व बाळंतपणानंतर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी आई व बाळाची नर्सिंग केअर नीट न घेतल्यामुळे मृत्यू ओढावणे, ९९% रुग्णाची तब्येत खराब झाल्यानंतर त्यांना कळवा हॉस्पिटलला रेफर करण्यात येणे, कळवा रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णाची पूर्ण तपासणी केल्यानंतर बाळंतपणानंतरच्या देखभाल करण्यात दिरंगाई केल्याने मृत्यू झाल्याचा उल्लेख असणे, स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे असे प्रकार वारंवार घडत असणे, तसेच मागे एकदा रुग्णालयातील प्रसूती विभागातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून गर्भवती महिलेला रुग्णालयात भरती न केल्याने गर्भवती महिलेला इतरांनी सहाय्य केल्यामुळे रात्री ११ वाजता रुग्णालय आवारात प्रसूती होणे, माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेनंतर बाळंतीन आईची स्थिती गंभीर झाल्यावर तिला मुंबई येथील रुग्णालयात दाखल करावे लागणे, सदर प्रकरणी महिलेचे पती श्री. अफसर शेख यांनी रुग्णालयातील कर्मचारी व डॉक्टर यांच्या हलगर्जीपणाविरुद्ध शांतीनगर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करणे, स्व श्रीमती इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय परिसरातील रुग्णांच्या सेवेकरिता अपुरे असल्याने इमारतीचे विस्तारीकरण नूतनीकरण व दुरुस्ती इत्यादी कामे करण्याचा रु.२२.९५ कोटी रुपयेचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असणे, इमारतीचे दरवाजे खिडक्या बदलणे इमारतीच्या तळमजल्याची दुरुस्ती करणे पिण्याच्या पाण्याची व सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे, इमारतीच्या परिसरात पेवर ब्लॉक बसविणे, कंपाउंड वॉल तयार करणे, इमारतीचा दर्शनी भाग तसेच इमारतीच्या आवारातील रस्ते व संरक्षण भिंत तयार करणे इ. स्थापत्य कामांकरिता रु.१२.२६ कोटी रुपयांची तरतूद असणे व इमारतीतील विद्युत कामांकरिता रु.१०.५९ कोटी रुपयांची तरतूद झालेली असणे, कामे करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या सुचविलेला इमारत नकाशा वास्तुशास्त्रज्ञ महाराष्ट्र शासन मुंबई यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ च्या पत्रान्वये मंजूर केला असून रुग्णालयाच्या दुरावस्थेसह

अप्रकाशित

नागरिकांना उत्तम सेवा सुविधा मिळण्याकरिता शासन स्तरावर करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती शहर "ड" वर्ग महानगरपालिका असुन आजची लोकसंख्या ८ लक्ष असून सन १९८३ पासुन अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मजीप्रा मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अमरावती शहरापासुन ५५ कि.मी. दुर असलेल्या अप्पर वर्धा धरण, मोर्शी येथुन शहराकरीता पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अस्तित्वातील योजना सन १९८६ मध्ये मंजुर झाली असुन १९९४ ला कार्यान्वीत करण्यात येणे, अमृत १.० मध्ये केवळ शहरांतर्गत वितरण व्यवस्था, जलशुद्धिकरण केंद्र व उंच साठवण टाक्या अस्तित्वातील १५६ दशलक्ष प्रवाह क्षमतेची जलवाहिनी विचारात घेवुन प्रस्तावित करण्यात येणे, यामुळे योजनेतील ३१ कि.मी. लांब **PSC** गुरुत्ववाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्यमान सन २०२४ मध्ये संपत असून ही पाईपलाईन कमकुवत झाल्यामुळे वारंवार फुटत असून व दुरुस्तीकरीता शहराचा पाणी पुरवठा ३-४ दिवस खंडित राहत असल्याने ही योजना अमृत २.०० योजनेतून करण्यासाठी मागील ३ वर्षापासून वारंवार मागणी करुनही व जिल्हा स्तरावर याबाबतचा प्रस्ताव दोन वेळेला राज्य शासनाकडे पाठवुनही या प्रस्तावाला मान्यता देण्यात न येणे, जुनी जिर्ण झालेले आयुष्यमान संपुष्टात आलेली सिमेंटची गुरुत्वाहिनह बदलविणे अत्यावशक असून त्या सोबतच अतिरीक्त उध्ववाहिनी क्षमता वाढविण्याकरीता अंथरणे आवश्यकता असतांना या योजनेला अमृत २.०० या मधुन मान्यता मिळत नसल्यामुळे ही योजना पुर्ण करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे अमरावती शहराला पाणी पुरवठया पासून वंचित राहण्याची निर्माण झालेली भिती, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन अमरावती शहरासाठी नियोजित पाणी पुरवठा योजनेला अमृत २ अंतर्गत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन सदर योजना तातडीने पुर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री. संजय गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय बुलडाणा येथे एन.एल. हेल्थ केअर सोलापुर या संस्थेला सन २०२२-२३ मॉडेयुलंर ओटी व लेबर रुमचा २३ कोटी रुपयांचा पुरवठा आदेश देण्यात आलेला असणे, जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी कुठल्याही प्रकारे निवीदेद्वारे खरेदी न करता ८०% आगाऊ रकम देणे, कंत्राटदार सोबत संगनमत करुन शासनाची करोडो रुपयांची केलेली तफावत, निकृष्ट साहित्य देणे, खोटे बिल सादर

अग्रिम प्रत

करणे, कोवीड काळात निष्काळजीपणा करणे, ही बाब लक्षात घेता दिनांक २६/२/२०२३ ला कंत्राटदार यांना सक्तीची नोटीस बजावणे, कंत्राटदार व जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी मोठ्या प्रमाणामध्ये बिले काढणे, पुन्हा या वर्षाचा सन २०२३ चा कंत्राट त्यांनाच देणे, याबाबत तातडीने मागील वर्षाची चौकशी करून या वर्षाचा कार्यरंभ आदेश रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री. नितीन पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण यांच्या अखत्यारित पॅकेज न. एनएसके-५४ (**A & B**) नाशिक जिल्ह्यातील सटाणा कळवण दिंडोरी निफाड व सिन्नर तालुक्यातील नामपूर-सटाणा-कळवण-वणी पिंपळगाव निफाड सिन्नर रस्ता रामा २७ कि.मी. 0/00 ते ७३/८०० ची सुधारणा करणे, सटाणा, कळवण, दिंडोरी, निफाड व सिन्नर जि. नाशिक (ब) नाशिक दिंडोरी, वणी प्रमुख राज्य क्रमांक ३ कि.मी. १०/७५० ते ४२/५०० रस्ता दिंडोरी ते वणी ची सुधारणा करणे या कामास सन २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देवून मंजुरी देण्यात येणे, सदर रस्त्यास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, नाशिक यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी संबंधित मक्तेदार एजन्सीस कार्यारंभ आदेश देणे, मुळ प्रकल्पाची किंमत १९४.९२ कोटी इतकी असणे हा रस्ता कळवण शहरातून जात असणे, कळवण शहर हे तालुक्याचे ठिकाण असून सन २०१७ ते २०१९ या दोन वर्षाच्या काळात या ना त्या कारणाने रस्ता दुर्लक्षित राहिल्याने प्रत्यक्ष काम हे ठेकेदाराच्या चुकीमुळे संथ गतीने सुरु होणे, रस्त्याच्या कामात होणाऱ्या विलंबामुळे नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागणे, या रस्त्याचा खर्च ४० टक्के सरकार तर ६० टक्के खासगी सहभागातून केला जाणार असणे, त्यात १५ वर्षे रस्त्यांची देखभालही ठेकेदाराला करावी लागणार असल्याचे करारनाम्यात नमूद असणे असे असतांना देखील सदरचा रस्ता गेल्या ५ वर्षापासून रस्त्याचे काम खोळबंणे, सदरचा रस्ता संबंधित मक्तेदार एजन्सीने वेळेत पूर्ण न करणे, ठेकेदाराच्या दिरंगाईस सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठीशी घालणे, वेळोवेळी संबंधित मक्तेदार एजन्सीस कामास मुदतवाढ देणे, रस्त्याच्या संथगतीमुळे व रस्त्याच्या धुळीमुळे स्थानिक नागरिकांना फुफुसाचे आजार होणे, रस्त्याचे काम वेळोवेळी बंद ठेवल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीचे वातावरण, याच मार्गावर साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले श्री सप्तश्रृंगी देवीचे पीठ असून या ठिकाणी देशभरातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असणे परंतु सदर रस्त्याचे काम संथगतीने होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होणे, ऑक्टोबर महिन्यात ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे २ निष्पाप नागरिकांना याच रस्त्यावर अपघात होवून आपला जीव गमवावा लागणे, परिणामी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी

अग्रिम प्रत

कळवण शहर बंद ठेवून संबंधित मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची तहसिलदार व कळवण पोलीस स्टेशनकडे मागणी करणे, स्थानिक लोकप्रतिनीधींनी देखिल जिल्हा वार्षिक सभेत मा. पालकमंत्री यांच्या ही गोष्ट निदर्शनास आणून देवून मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करणे, पालकमंत्री यांनी देखिल संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणे , पालकमंत्री यांनी आदेश देवून देखिल सदर मक्तेदार एजन्सीवर कोणतीही कारवाई न होणे, या सर्व कारणांमुळे नागरिकांत प्रशासनाविरोधात व शासनाविरोधात असंतोषाचे वातावरण तयार होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(९) **ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''नाशिक जिल्हयातील सिन्नर नगरपरिषदेतर्फे शहरात करण्यात आलेल्या विविध विकास कामांमध्ये निकृष्ट दर्जाची कामे करणे, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष कामे न करताच कागदोपत्री पूर्ण केल्याचे दाखविणे, तर काही कामे पूर्ण होण्याआधीच ठेकेदाराला आगाऊ निधी अदा करुन नगरपालिका मुख्याधिकारी श्री.केदार व सबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी शासकीय निधी हडप करुन भ्रष्टाचार केल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, पाणी पुरवठा योजनेच्या देखभालीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक अवास्तव प्रमाणात ७२ लाख रुपये खर्च मंजुर करणे, नगरपरिषद हद्दीत सुर्वोदय संकुलाचे इमारतीस पार्किंगची व्यवस्था न करता आर्थिक संगनमत करुन बांधकाम करण्यास परवानगी देणे व पूर्णत्वाचा दाखल घेणे, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जमीन खरेदीत मर्जीतल्या लोकांनी सन २०१७ मध्ये ८७ लाख ५० हजार रुपयाला घेतलेली जमीन याच लोकांकडून अवघ्या दोन महिन्यात १ कोटी ८४ लाख ९२ हजार किंमतीला नगरपालिकेला विक्री करुन ९७ लाख ४२ हजार रुपये निधीचा अपहार करणे, शहरातील सरस्वती नदीपात्राचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकारी यांनी मंजुर केलेल्या १.७५ लाख रुपये इतका निधी कोणतेही काम न करता ठेकेदारास देयक अदा करणे, सौंदर्यीकरण कामाऐवजी नदीपात्रात अतिक्रमण करुन नदीचे पात्र छोटे केल्याचा प्रकार घडणे, दयानंद बारादरी मठ दशक्रिया विधीच्या जागेवर शेडचे काम न करताच मंजुर केलेला ४८ लाख रुपये निधी हडप करणे, घनकचरा उचलण्यासाठी पालिकेने खरेदी केलेल्या टाटाच्या ४०७ गाडयांचा वापर न करता ५० हजार रुपये दरमहा भाडयाने ट्रॅक्टरने कचरा उचलण्यात येऊन याद्वारे शसकीय निधी हडप करुन भ्रष्टाचार करणे, शहर हद्दीतील स्ट्रिट लाईटचे काम निकृष्ट दर्जाचे मटेरिअल वापरल्यामुळे वारंवार लाईट खराब होणे, धनलक्ष्मी पतसंस्थेजवळच १८ लाख रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेला रस्ता पूर्णपणे निकामी झाला असून त्याची क्वॉलिटी कंट्रोल कडून ऑडिट करण्याची होत असलेली मागणी, सदरहू

भ्रष्टाचार प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांना दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी लेखी तक्रार देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, महिला कर्मचाऱ्यांशी अत्यंत उध्दटपणे वागणे, विचारलेल्या प्रश्नांची चुकीची उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभुल करणे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन नगरपरिषदेच्या सबंधित दोषी अधिकारी यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री.लहू कानडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्याच्या २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी सुमारे २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, तरी वर्षभरात एकूण तरतुदीच्या ५० टक्केही खर्च झालेला नसल्याची धक्कादायक बाब दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध शैक्षणिक योजनांवरील खर्चातही घट झाल्याचे समोर येणे, राज्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक यांच्यासाठी आर्थिक व शैक्षणिक उन्नतीच्या २३० योजना राबविल्या जात असणे, त्यात १५४ राज्य शासन अर्थसहाय्याचे व ७६ केंद्रीय अर्थसहाय्याच्या योजना असणे, राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर या योजना राबविल्या जात असणे, २०२०-२१ मध्ये अनुसूचित जातींसाठी ९ हजार ६६८ कोटी रुपये तरतूद करण्यात येणे, त्या वर्षात खर्च ६ हजार ४६१ कोटी ८४ लाख रुपये झालेला असणे, २०२१-२२ मध्ये तरतूद १० हजार ६३५ कोटी, खर्च ८ हजार ८२८ कोटी ४९ लाख करण्यात येणे, २०२२-२३ मध्ये (चालू अर्थलंकल्प) १२ हजार २३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, परंतु १५ फेब्रुवारीपर्यंत ४ हजार ५८१ कोटी रुपये खर्च झाला असणे, म्हणजे ५० टक्क्याहून कमी खर्च झाला असल्याचे उघडकिस येणे, अनुसूचित जातींसाठी विविध शैक्षणिक योजना राबविल्या जात असणे, त्यापैकी देशांतर्गत व परदेशातील विद्यापीठांमधून उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती या नावाने दिली जात असणे,२०२१-२२ मध्ये देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी १४५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे त्यावर ३ कोटी रुपये खर्च करण्यात येणे. २०२२-२३ मध्ये मात्र लाभार्थी विद्यार्थी संख्येत घट झाली असून या वर्षात ७० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे, त्यावर ९८ लाख रुपये खर्च करण्यात येणे, परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठी २०२१-२२ मध्ये २१० विद्याथ्र्यांच्या शिष्यवृत्तीवर ५३ कोटी रुपये खर्च करण्यात आला असल्याचे उघडकीस येणे, त्यामुळे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना व विद्यार्थ्यांना विकासापासून रोखण्याचा केला जात असलेला जाणीवपूर्वक प्रयत्न, अनुसूचित जाती व जमातीच्या वर्गामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व असुरक्षितेचे भावना,याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

असुधारित प्रत

(११) **श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात परभणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्यात श्री. संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या गोदावरी काठावरील स्थानास दक्षिण काशी म्हणून ही ओळखले जात असणे, पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या प्राचिन व पवित्र घाटावर राज्यभरातून व शेजारील राज्यातील नागरिक येथे दशक्रिया विधी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सतत येत असणे, संत गजानन महारांजाची पालखी तेथे विसावा घेत असणे, या घाटाची व मंदिरांची वर्षोनुवर्षे कोणतीच देखभाल दुरुस्ती होत नसल्याने या मंदिरांचे अस्तिवच नष्ट होत असणे, मंदिराच्या पाठीमागे असलेला नाला खचत असल्याचे निर्दशनास येवून मंदिरास त्याचा धोका निर्माण झाल्याचे समोर येणे, त्यासाठी या क्षेत्रास तात्काळ पर्यटन तथा तिर्थक्षेत्र ब व क वर्गाचा दर्जा देवून पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी नागरिकांमधून व लोकप्रतिनीधींकडून वेळोवेळी करुनही प्रशासन कोणतीच दखल घेत नसणे, त्यासाठी शासनाने या थोर संत जनाबाईच्या जन्माने पावन झालेल्या जनाईनगरच्या भूमिचे रक्षण करणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. पराग अळवणी, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अमित साटम, समाधान अवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्याची सध्याची लोकसंख्या ही अंदाजे ११ कोटीच्या जवळपास असणे, राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी २.५ कोटी कुटुंब हे रेशनकार्ड धारक असणे, एकूण रेशनकार्ड धारकांपैकी १.७१ कोटी केशरी कार्ड धारक व ६२.६० लाख कुटुंब हे पिवळे रेशनकार्ड धारक असणे, यामधील अंदाजे ६५.३४ लाख कुटुंब हे केंद्र व राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत धान्य घेत असणे, केंद्र व राज्य सरकारकडून वेळोवेळी स्थानिक रेशन कार्यालयामार्फत आवश्यक रेशन सामुग्री (धान्य) उपलब्ध होत असणे, परंतु काही रेशन दुकानदार हे फक्त ६०% नागरिकांना रेशन समुग्रीचे वाटप करीत असून उर्वरित ४०% नागरिक हे पात्र असून त्यांना रेशन मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, बहुतांश वेळा मशीनच्या तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांचे अंगठ्याचे ठसे स्वीकारले न गेल्यामुळे त्यांना रेशन मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, सदर बाबतीत नागरिकांची काहीएक चूक नसताना देखील निव्वळ तांत्रिक कारणांमुळे त्यांना रेशन पासून वंचित रहावे लागत असणे, रेशन वाटपाच्या धोरणानुसार एकाद्या रेशनकार्ड धारकाने काही कारणास्तव सलग ३ महिने रेशन न घेतल्यास त्यांचे रेशन मिळणे बंद होत असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात सरकार विषयी निर्माण होणारी

अप्रमाणित प्रत

अविश्वासची भावना, रेशन वाटपाबाबतच्या सरकारच्या सदरच्या धोरणात बदल करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(१३) **श्री. कैलास पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात  अवैध दारू विक्री सुरू असणे, राज्य उत्पादन विभागांनी या दारू विक्रीकडे दुर्लक्ष करणे, यामुळे अवैध दारू विक्रीचे पेव फुटणे, या अवैध दारूमध्ये काही गुन्हे गोवा बनावटीची तसेच स्थानिक डुप्लिकेट दारू विक्रीस उपलब्ध असणे, यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणे, तसेच शासनाचा महसूलही बुडत असणे, जिल्ह्यात चौका चौकात अवैध दारू विक्री सुरु असणे, ड्रायडेच्या दिवशी बरेच नागरिक अवैधपणे दारू विकत असणे, या अवैध दारू विक्रीमध्ये बनावट तसेच गोवा बनावटीची दारू विक्रीसाठी उपलब्ध होत असणे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे यासर्व प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, पोलीस विभागाने याबाबत धडक मोहीम करत गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून अवैध दारू विक्री बंद करणे, पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात मर्यादा असल्यामुळे या अवैध दारु विक्रीला आळा घालण्याचे काम राज्य उत्पादन शुल्काचे असणे, परंतू राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अवैध दारू विक्रेत्यांकडून हफ्ते वसुली करण्यात येत असल्याचे उघडकीस येणे, तसेच काही ठिकाणी खाजगी व्यक्तींची अवैध दारु विक्रेत्यांकडून हप्ते वसुलीसाठी नियुक्ती करण्यात येणे, तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी मुख्यालयी न राहता अन्य ठिकाणी वास्तव्यास असणे, यामुळे कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्यामुळे दिवसेंदिवस अवैध दारू विक्रेते निर्माण होणे, जिल्ह्यात नवीन ७५ परमिट रूम व बिअर शॉपी वितरित करणे, यामध्ये जवळपास पाच कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येणे, याबाबत जिल्ह्यातील नागरिकाकडे ऑडिओ क्लिप उपलब्ध असणे, यामुळे राज्य उत्पादन विभागाची प्रतिमा मलिन होणे, या भ्रष्टचार प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरीकांकडून होत असणे, शासनाने उक्त सर्व प्रकरणी तात्काळ चौकशी करुन धाराशिव जिल्ह्यातील अवैध दारु विक्रीला आळा घाण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.’’

(१४) **श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मौजे जिंती (ता. फलटण, जि.सातारा) येथील रयत शिक्षण संस्थेने जिंती येथील

अग्रिम प्रत

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची २ एकर जमिन सदर विद्यालयास जागेची अडचण असल्याने शाळेची इमारत व क्रिडांगणासाठी दिनांक १२ फेब्रुवारी, १९९० रोजी १६ हजार रुपयांत विकत घेतलेली असणे, कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 18/02/1191 रोजी जिंती येथील जमिन शिक्षण संस्थेला देण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली असणे, मा.खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी या प्रस्तावास स्थगिती आदेश दिला असतांना रयत शिक्षण संस्थेला ही जमिन देण्यात आलेली नसणे, परंतु आता मा.खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी स्थगिती आदेश उठविल्यामुळे मंडळ अधिकारी व तालुका फलटण यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी तहसिलदार, फलटण यांना २ एकर जागेचा ताबा रयत शिक्षण संस्थेस देण्याचे दिलेले निदेश, परंतु प्रांत अधिकारी, फलटण यांनी सदरची जागा शिक्षण संस्थेस देण्यास सुरु केलेली टाळाटाळ, त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांत व त्यांच्या पालकांत पसरलेली भितीची भावना, सदर जागेचा ताबा रयत शिक्षण संस्थेस देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१५) **श्री. विश्वनाथ भोईर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मौजे मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील उल्हास नदीच्या पुलाजवळ गोदरेज समूहाने मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पचे काम सुरू करणे, सदर गृहनिर्माण संकुल बांधकामाकरिता गोदरेज समूहाने नदीतील परिसरात मोठ्या प्रमाणात केलेल्या उत्खननामुळे उल्हास नदीच्या तीरालगत असलेल्या नैसर्गिक उंचवट्याचा समतोल बिघडणे, परिणामी आर.आर.झेड व सी.आर.झेड. क्षेत्रातील नियमाची पायमल्ली सदर विकासाकडून होणे, उल्हास नदी परिसरातील उपरोक्त नैसर्गिक उंचवटा हा अतिवृष्टी काळात सह्याद्री खोऱ्यातील मोहने बंदराकडून पाण्याचा जोर उल्हास नदी पुलाखालून वाहत येणाऱ्या पुराच्या पाण्याची गती वक्राकार नैसर्गिक उंचवट्यामुळे इतरत्र न पसरतात थेट बारावे जंक्शन येथे कल्याणकडे जाऊन मिळत असणे, असे जुन्या जाणकारांचे मत असणे, उल्हास नदीच्या उपरोक्त नैसर्गिक उंचवट्याचा (टेप) समतोल बिघडल्याने संभाव्य पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, त्याचा धोका उल्हासनदी व बारावेखाडी परिसरातील वडवली,अटाळी,शहाड, गौरीपाडा,बारावे जंक्शन या नदी परिसरातील गावांना बसून मोठी वित्त व जीवन होण्याची शक्यता नाकारताना येणे,उल्हासनदी पुला जवळ नदीतीरा लगत गोदरेज समूहाने सुरू केलेल्या बांधकामा साठी नदी परिसरात केलेल्या उत्खननामुळे आर. आर.झेड.व सी.आर.झेड. नियमांची सदर विकासकाने केलेल्या उल्लंघनाचे सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अप्रकाशित प्रत

(१६) **सर्वश्री. संजयमामा शिंदे, अजित पवार, बबनराव शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी शहर हे महत्वाचे शहर असून एक मोठी बाजारपेठ असणे, रेल्वे जंक्शनमुळे शहराचे महत्व आणखीन वाढलेले असणे, गेल्या कित्येक वर्षापासून वर्ग-ब मालमत्ता धारकांचा प्रश्न प्रलंबित असणे, गेल्या चार ते पाच पिढ्या कब्जे वहिवाट आणि मालकी हक्कात राहणाऱ्या जवळपास ९१७ मालमत्ता असणे, या मालमत्ता बाबत १९९४ ला सिटीसर्व्हे करणाऱ्या चमुने सदर मालमत्याची नोंद महाराष्ट्र शासन सदरी ब वर्ग केलेली असणे, त्या नोंदीमुळे शहरातील जवळपास सर्व व्यापारी मालमत्ता धारक अडचणीत येवून त्यांना विस्थापित होणेची परिस्थिती निर्माण झालेली असणे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, सोलापूर यांनी या ब वर्ग मालकी प्रकारावर "महाराष्ट्र शासन" लावलेली नोंद सदोष असल्याचे सांगणे, नगर भूमापक नियम पुस्तक सिटी सर्व्हे मॅन्युअल १९८८ कलम १२७ प्रमाणे सत्ता प्रकारच्या व्याख्येप्रमाणे सत्ता प्रकार ब मध्ये मिळकत धारकांच्या सदरी महाराष्ट्र शासन नाव दाखल करणे अपेक्षित नसून फक्त ग वर्ग मालमत्ता धारक हा कायमस्वरुपी "महाराष्ट्र शासन" असतो, असे नमूद करणे, या ९१७ चे मालमत्तेचे वर्गीकरण एक आकडा ब प्रकार ७६५ आणि इतर १५२ असे असणे, यापैकी जवळपास ३६५ मालमत्तेचे महाराष्ट्र शासन नाव कमी करणेत आले असणे, मात्र उर्वरीत मालमत्ता धारकांना अद्याप न्याय मिळालेला नसणे, शासनाने त्यांचे ११०९ व २०१२ मधील शासन निर्णयाव्दारे कार्यवाही करण्याचे आदेशित केले असतानाही महसूल विभागामार्फत पर्यायाने उप विभागीय अधिकारी कुर्डुवाडी (ता. माढा) यांचेमार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, तद्नंतर उप विभागीय अधिकारी, कुर्डूवाडी यांचे कार्यालयात संबंधीत मालमत्ता धारक, प्रशासन व लोकप्रतिनिधींची बैठक पार पडणे, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, माढा यांना यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी विशेष कॅम्प घेणेची सूचना करणे, मात्र उपअधिक्षक या कॅम्पसाठी गैरहजर राहणे, त्यामुळे अद्यापही सदरचा प्रश्न आहे तसाच असणे, एकंदरीत सदरचा प्रश्न खूप वर्षे प्रलंबित असल्याने स्थानिक नागरीकांमध्ये प्रशासनाविषयी चिड निर्माण होणे, यांच्या पिढीजात मालमत्ता त्यांना मिळणे विषयी त्यांची होत असलेली मागणी, याबाबत संबंधित मालमत्ताधारक यांना न्याय देण्यासाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१७) **श्री. तान्हाजी मुटकुळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मौ. बळसोंड (ता. जि. हिंगोली) येथील जुना शेत सर्वे क्रमांक ४ नवीन गट क्रमांक १२ एकूण क्षेत्रफळ ९ हेक्टर ६० आर ही पूर्वी मूळची गायरान जमीन असणे, ही शेत जमीन हिंगोली शहरानजीक असल्यामुळे व बाजार मूल्य जास्त असल्यामुळे काही

राजकीय भूमाफियांनी तत्कालीन शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून सदर जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करून लगेच श्री केशव शेषराव गवळी या व्यक्तीच्या माध्यमातून विक्रीची परवानगी घेणे व त्याआधारे शासकीय जमीन बळकावणे, सदर जमीन भोगवटदार वर्ग २ असून सुद्धा या जमिनीवर अनाधिकृत व विनापरवाना इमारत बांधकाम करून शैक्षणिक संस्थेस भाडेतत्त्वावर देणे, परिणामी सदर प्रकरणी शर्तभंग होणे, याप्रकरणी विधानसभेत दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता तत्कालीन महसूल मंत्री महोदयांनी सदर प्रकरणी शर्तभंग झाल्याचे मान्य करून संपूर्ण जमीन शासन जमा करण्याबाबतचे आश्वासन देणे, परंतु अद्यापही ८ हे ८० आर जमीन शर्तभंग करणारी व्यक्ती श्री केशव शेषराव गवळी यांचे नावे असणे, सदर जमीन बेकायदेशीर रित्या हडप केल्याप्रकरणी मूळ लाभार्थ्यांनी श्रीमती सखुबाई भीमराव पाईकराव व इतर सर्व यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या सुमारास आमरण उपोषण करणे व जमीन परत देण्याबाबत प्रशासनास विनंती करणे, परंतु याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, याप्रकरणी शासनाने तात्काळ सदर संपूर्ण शेतजमीन शासन जमा करून मूळ लाभार्थ्यांना देण्याबाबत व दोषींना कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(१८) **श्री. राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील अमोणी, कालीबेल, चौगाव बुद्रुक, रोझवा, रापापूर, सोमावल खुर्द, ढेकाटी इत्यादी गावातील साधारणतः ६५९ वनहक्क दाव्यांचा समावेश असणे, सदर दावेदारांनी वनहक्क कायदे अंतर्गत मागणी केलेले क्षेत्र साधारतः ५५० हेक्टर इतके असणे, सदर अतिक्रमण असल्याचे पुरावे सदर अतिक्रमण धारकांकडे असणे, तसेच आजतागायत सदर वनपट्टे अतिक्रमण धारकांच्या ताब्यात असून जमीन कसत असणे, मागील दोन वर्षापासून अति पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याने त्यांना नुकसान भरपाई सुद्धा शासनाकडून मिळत असणे, परंतु, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ नुसार कलम ३ (१) (क) अन्वये वैयक्तिक वनहक्क दावे दाखल केलेले असूनही फेटाळणे, कारण सन १९९५ मध्ये सरदार सरोवर प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी महसूल विभागाकडे वर्ग केलेली असणे, परंतु, प्रशासनाच्या दुर्लक्षाने सदर वनजमिनीवरील अतिक्रमण नमूद केल्याचे नसणे, त्यामुळे सदर वनजमीन दावे जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे शिफारस न करता फेटाळले जाणे, याबाबत स्थानिक प्रशासनाने मा. प्रधान सचिव, वने व अप्पर मुख्य सचिव, महसूल व मा.आयुक्त, आदिवासी विभाग यांना वारंवार पत्रव्यवहार करून मार्गदर्शन मागविलेले असणे, परंतु, शासनाकडून अद्याप पावेतो कुठलेही मार्गदर्शन प्राप्त न होणे, त्यामुळे सदर वनहक्क

दाव्यांवर कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी वनहक्क धारक जनतेमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रया."

(१९) **श्री. कुणाल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"धुळे तालुक्यात सिंचन विहिरीचा लाभ मिळवून देण्याच्या बहाना करत शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करणारे रॅकेट सक्रिय झाले असल्याचे निदर्शनास येणे, शासनाकडून जिल्ह्यासाठी सिंचन विहिरींचे कोणते उद्दिष्ट प्राप्त नसताना शेतकऱ्यांना अर्ज विक्री होत असल्याच्या तक्रारी स्वतः शेतकऱ्यांनीच प्रशासनाकडे केलेल्या असणे, विहित अर्जाचा कुठलाही शासकीय नमुना अस्तित्वात नसताना धुळे व साक्री तालुक्यात बनावट अर्ज छापले कुणी ? असा प्रश्न शेतकरी बांधव उपस्थित करीत असणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून मागेल त्याला सिंचन, विहिरीचा लाभ देण्याची योजना शासनाने हाती घेतल्यानंतर सन २०१६-१७ मध्ये सिंचन विहिरींसाठी तीन लाख रुपये प्रति लाभार्थी लाभ दिला गेला, दिनांक ४ नोव्हेंबर, २०२२ ला सुधारित शासन निर्णय प्रसारित करुण सिंचन विहिरींच्या अनुदानात चार लाख रुपयांची वाढ करत पात्र शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज सादर करण्याचा सूचना केल्या जाणे, पण शासनाचे ऑनलाइन पोर्टल सुरू न झाल्याने पूर्वीच्या पद्धतीने ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करून ग्रामसभेत लाभार्थीची निवड करणे आवश्यक असणे, असे असतांना धुळे तालुक्यात सिंचन विहिरींच्या नावाने शेतकऱ्यांच्या आर्थिक लूट करणारे रॅकेट सक्रिय झाले असून त्यांच्याकडून १००० सिंचन विहिरींचा लक्षांक मिळाल्याची अफवा पसरवण्यात आलेली असणे, पंचायत समितीच्या माध्यमातून जिल्हापरिषद सदस्यांना २० आणि पंचायत समिती सदस्यांना २० अर्ज देण्यात आलेले असणे, या छापील अर्जावर जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांकडून शिक्का मारून शेतकऱ्यांना अर्ज विक्री केले जात असून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असणे, सिंचन विहिरींसाठी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानात अनेक वाटेकरी तयार झालेले असून शेतकऱ्यांना अर्ज उपलब्ध करून देण्याच्या बदल्यात ३५ ते ४० टक्के घेतले जात असून शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार टक्केवारीत पंचायत समितीतील काही अधिकारी, अभियंत्यांसह, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या काही सदस्यांचा देखील वाटा असल्याची माहिती निदर्शनास येणे, सदर बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(२०) **डॉ. विनय कोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यात मलकापूर हे अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील व कोल्हापूर रत्नागिरी रस्त्यावर वसलेले व मोठी बाजारपेठ असलेले शहर असणे, तसेच रत्नागिरी-नागपूर हायवे मलकापूर शहरावरून जात असणे, सदर हायवेवर अपघात होणे, रत्नागिरी व कोल्हापूर यांच्यामध्ये मोठी दुर्घटना घडल्यास कोणताही दवाखाना नसणे, त्यामुळे अनेक लोक वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्यामुळे त्यांचे निधन झालेले असणे, तसेच जंगलाचा परिसर असल्यामुळे सर्पदंश आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडत असणे, त्यांना सुद्धा वेळेत उपचार तेथे मिळत नसणे, त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयासाठी लोकसंख्येची जी अट आहे त्याचा विचार न करता या विशिष्ट पार्श्वभूमीवर उपजिल्हा रुग्णालय देण्याची गरज असणे, मलकापूरच्या १० किलोमीटर परिघांमध्ये ६० ते ६५ खेडी असणे, मलकापूर शहरासह आजूबाजूच्या खेड्यांमधील लोकसंख्या वाढल्याने सध्याचे ग्रामीण रुग्णालय, मलकापूर आरोग्य सेवा देण्यासाठी अपुरे पडत असणे, अत्यवस्थ रुग्णांना जिल्हा रुग्णालयांमध्ये हलविण्यासाठी सध्या ७० ते ८० किलोमीटर अंतर जाते वेळेस रुग्ण दगावण्याची शक्यता असणे, मलकापूर सारख्या अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील शहरात उपजिल्हा दर्जाचे रुग्णालय नसणे, त्यामुळे सदर शहर व आजूबाजूच्या खेड्यातील रुग्णांना अति तातडीची आरोग्य सेवा मिळण्यासाठी बऱ्याच अडचणी असणे, त्यामुळे सध्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे काळानुरूप श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करणे गरजेचे असणे, सध्या अपघातातील रुग्ण, प्रसूतीपूर्व माता, गंभीर आजारी रुग्ण यांना तातडीची आरोग्य सेवा मिळण्यासाठी अडचणी असणे, त्यामुळे सदर विभागातील नागरिकांची चांगली शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करण्याबाबतची मागणी असणे, याबाबत होत असलेल्या दिरंगाईमुळे त्यांच्यामध्ये पसरलेले नैराश्यचे वातावरण अशाप्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची व सध्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(ब) : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना)**
**(क्रमांक १ ते ५)**

**(१) श्री.अमित साटम, वि.स.स.**

"मुंबई शहरामध्ये म्हाडा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या पुनर्विकासित इमारतीतील गाळे वितरणात झालेली अनियमितता" या विषयावरील श्री. अमित साटम, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५३८०५ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"दौंड तालुक्यांसह (जि.पुणे) राज्यात मोठया प्रमाणात चिबाड शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी धोरण ठरविण्याबाबत" या विषयावरील ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १०५ मधील प्रश्न क्रमांक ४०४१२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री. रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत" या विषयावरील श्री.रईस शेख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५१३४८ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(४) श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स.**

" पुणे अहमदनगर प्ररामा-५ राष्ट्रीय या महामार्गावर वाहतूक कोंडीमुळे प्रदूषण व अपघाताच्या वाढत असलेल्या समस्या" या विषयावरील श्री. सुनिल टिंगरे, वि.स.स. यांचा दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १०४ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ३९०३७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

अप्रकाशित प्रत

**(५) श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स.**

"नाशिक महापालिकेतील शालेय पोषण आहार पुरविणाऱ्या दोषी संस्थांनाच पोषण आहार पुरवठ्याचे आदेश दिल्याबाबत" या विषयावरील श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५१८०१ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**( सकाळी ११.०० वाजता )**

असुधारित प्रत

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(क) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(१) **महसूल मंत्री** : दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.दौलत दरोडा, वि.स.स. यांचा "आमगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील जमीनदाराने इनामात मिळालेली जागा शासनाची पूर्व परवानगी न घेता विकल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३९३५४ ला दिलेल्या उत्तरातील आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.राजन साळवी, वि.स.स. यांचा "ओणी-अणुस्कुरा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ५७४३३ ला दिलेल्या उत्तरातील आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

| | | |
|---|---|---|
| **(१) मुख्यमंत्री** | : | कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **(२) उप मुख्यमंत्री** | : | भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) महाराष्ट्र शासनाद्वारे लोकसेवांचे वितरण यावरील अहवाल तसेच (२) Special Audit Report On Brihanmumbai Municipal Corporation सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३) इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | : | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या. (उपकंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचे सन २०१९-२०२० चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाला राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे.**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. सुरेश भोळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“जळगाव महानगरपालिकेत असणारी अनुकंपा भरती दहा वर्षापासून रखडलेली असून अनुकंपा भरती यासंदर्भात मयत कर्मचाऱ्यांचे वारसदार खूप वर्षापासून मंत्रालय नगर विकास खात्याकडे पाठपुरावा करीत असणे, जळगाव महानगरपालिकेत सध्या कर्मचारी हे स्थायी आस्थापना व कर्मचारी असून कर्मचारी वीस ते पंचवीस वर्ष त्या ठिकाणी काम करून सुद्धा त्यांच्या वारसांना इतक्या वर्षापासून त्यांना मिळणाऱ्या

लाभापासून वंचित ठेवण्यात आलेले असणे, जळगाव महानगरपालिकेला मंत्रालया मधून प्राप्त होत असणारा निधी याचे मनपा मधून वेळोवेळी दखल घेतली जात नसणे, जळगाव महानगर-पालिकेमध्ये नवी आकृतीबंध चा प्रस्ताव अजून पर्यंत प्रलंबित असणे, तसेच मनपा मधील रिक्त पदे सध्या मनपा मध्ये १५०० हुन अधिक पदे रिक्त असल्याचे आस्थापना विभागाकडून माहिती देण्यात आलेली असणे, या कामासाठी कर्मचारी नसल्यामुळे शहरातील नागरिकांचे गैरसोय होत आहे व त्याचा परिणाम महानगरपालिकेवर होत असणे, त्यामुळे नवीन सरळ सेवा भरती करणे शक्य होत नसल्यामुळे महानगरपालिकेमधील कामकाजावर त्याचा परिणाम होत असणे, तरी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील भूमापन क्रमांक ६७०, ही जागा खाणीसाठी आरक्षित असणे, नोंद क्रमांक ११०८ प्रमाणे सदर जागा कराराने गौण खनिज काढण्यासाठी श्री.भागवत यांना ९९ वर्षाच्या कराराने देण्यात येणे, सदर जागा कराराने दिलेली असताना देखील सदर जागेवर गौण खनिजाचे उत्खनन न करता रहिवासी प्रयोजनासाठी वापर करणे, सदर जागेवरील महाराष्ट्र शासनाचे नाव कमी करून बेकायदेशीर रित्या खाजगी व्यक्तींचे नाव समाविष्ट करणे, सदर जागेची परस्पर विक्री करणे, यासारखी बाबी झाल्यामुळे शर्तभंगाचा प्रस्ताव करून सदर जमीन शासन जमा करण्याची असणारी आवश्यकता, स्थानिक लोकप्रतिनिधी कडून वारंवार मागणी करून देखील, सदर जमीन शासन जमा करण्यास होत असणारा विलंब, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांचे या बाबीकडे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, सदर प्रकरणात झालेला मोठ्या प्रमाणावरील गैरव्यवहार, या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना, शासनाच्या सर्वांसाठी घरे या धोरणानुसार, हक्काची घरे उपलब्ध करून देण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, सदर जागा शासन जमा करून घेण्यासाठी तत्काळ शर्तभंगाचा प्रस्ताव तयार करून कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री. अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अंधेरी पश्चिम येथील जुन्नत नगर, समता नगर व खजूरवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा अंतर्गत ई-मेल अशोक इंटरप्राईजेस व झोपडपट्टी धारक यांच्या १९९६

अप्रकाशित प्रत

साली विकासकरारनामा झालेला असणे, १९९८ साली विकासकांनी स्वतः झोपडीधारकांना विश्वासात न घेता बसायरा घर निर्माण संस्था प्रस्तावित नामक संस्था स्थापन केलेली असणे, सदर जागा ही खाजगी असून जागेच्या मूळ मालकाची ना हरकत किंवा खरेदी पत्र न केलेले असणे, २००३ साली सदर विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला प्रस्ताव सादर करुन सदर ठिकाणी परिशिष्ट दोन तयार करत असताना कोणत्याही प्रकारची स्थळ पाहणी किंवा बायोमेट्रिक सर्वे जागेवरती न केलेला असणे, सदर विषयावर मा.उच्च न्यायालयामध्ये स्टे ऑर्डर असतानाही जागेवर ४० पेक्षा अधिक झोपड्या तोडून सदर ठिकाणी अनधिकृत ट्रान्सझीट कॅम्प उभा केलेला असणे, सदर प्रकल्प हा २०१९ साल पर्यंत प्रलंबित असून त्यामध्ये कोणतेही कारवाई न होणे, स्थानिक झोपडपट्टी धारकांनी २०१९ साली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला तक्रार केलेली असल्यामुळे परिशिष्ट दोनच्या विषयी तक्रार केलेली असून तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी जाहीर नोटीस काढून सदर परिशिष्ट दोन ची पुनर्पडताळणी केलेली असणे व त्या पुर्नपडताळणी मध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी व चुका आढळल्या असून जागेवरची परिस्थिती व तयार केलेले परिशिष्ट दोन यामध्ये मोठी तफावत आढळून आलेली असणे, जागेवर घरे नसताना बोगस घरे परिशिष्ट दोन मध्ये दाखवण्यात आलेली असणे हे निष्पन्न होणे, ३०० झोपडपट्टीधारक आजतामयी त्या जागेवर असणे, ९५६ च्या परिशिष्ट दोन मधील फक्त ३०० मूळ झोपडपट्टी धारक जागेवर बसले आहे अशी बाब लक्षात आल्यामुळे सदर परिशिष्ट दोनच्या आधारावरती सदर पुनर्वसन प्रकल्प राबवण्यात अशक्य असणे, आणि त्यामुळे झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरणाच्या सचिव यांनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये नव्याने बायोमेट्रिक सर्वे करण्याचे आदेश दिले असता जून २०२२ मध्ये सदर विभागाचा बायोमेट्रिक सर्वे पूर्ण होऊन नवीन बायोमेट्रीक सर्व्हे नुसार नवीन परिशिष्ट दोन तयार करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर जुने परिशिष्ट दोन रद्द करून सदर प्रकल्पाला चालना देण्यासंदर्भामध्ये शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(४) **सर्वश्री. सुनील राणे, संजय जगताप, प्रकाश आबिटकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मुंबईतील बंद पडलेल्या ५८ गिरण्यातील कामगारासाठी व त्यांच्या वारसासाठी सवलतीच्या दरात घरे कामगारासाठी करुन देण्याच्या दृष्टिने आता पर्यंत सन २०१२, २०१६ व सन २०२० अशी तीन वेळा १७ हजार घरांची सोडत देणे, उर्वरित १ लाख ७० हजार गिरणी कामगार हक्काच्या घराच्या प्रतिक्षेत असून बंद पडलेल्या गिरण्याच्या जमिनीवर गिरणी कामगारांना म्हाडाने बांधलेल्या घरापैकी ६९२५ घराची पहिली सोडत दिनांक २८ जून, २०१२ मध्ये काढण्यात आली व घराचे वाटप केले परंतू सन २०२० मधील सोडतीपैकी घराचे वाटप अजूनही झालेले नसणे, कोनगाव, पनवेल येथील घरासाठी डिसेंबर, २०१६ मध्ये सुमारे २ हजार घरासाठी पैसे भरून ही अनेकांना घरे

मिळालेले नसणे, गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना घरे मिळण्यासाठी व गिरणी कामगाराच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी गिरणी कामगार संघटना गेल्या अनेक वर्षापसून संघर्ष करीत असून, अर्ज केलेल्या १ लाख ७० हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी ठोस आराखडा तयार एन टी सी मील च्या गिरण्याची जमिन घरासाठी उपलब्ध करुन देणे, श्रीनिवास आणि श्रीराम मिलच्या गिरणी कामगारांची कायदेशीर देणी देणे, स्वानच्या तीन्ही गिरण्यातील कामगारांना लवकर घरे देणे, खटाव मिलची जमीत डी.सी.आर प्रमाणे घरांसाठी देणे, कोनगाव पनवेल येथील घरे २ हजार ४१७ गिरणी कामगारांना वितरीत करणे, बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलच्या कामगाराची पात्रता निश्ति करुन घरांचा ताबा देणे, न्यू ग्रेट हिंदूस्थान व मुकेश मिलची जागा डीसीआर प्रमाणे घरासाठी देणे, गिरण्या चाळीतील रहिवाशांचे पूनर्वसन त्वरीत करणे त्यामुळे तातडीने दखल देऊन गिरणी कामगारांना न्याय देण्याची मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(५) **श्री. महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील १२ गावांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने कळमजाई शेती जलउपसा सिंचन परियोजना भिमाशंकर योजनेचे सर्वेक्षण करण्यात येणे, त्यानुषंगाने सर्वेक्षण पूर्ण होऊनही गेल्या ८ महिन्यांपासून योजनेचे काम अद्याप सुरू झाले नसणे, डिंभे धरणातील पाणी ६ टक्के प्रवाही उपसा सिंचनासाठी व १४ टक्के ठिबक तुषार उपसा सिंचनासाठी एकूण २० टक्के प्रकल्पिय पिक रचनेच्या क्षेत्रानुसार १ हजार २ हेक्टर प्रवाही आणि ६९४ हेक्टर ठिबक द्वारे देण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाकडून मंजुरी मिळाली असणे, गोहे खु., गोहे बु., राजेवाडी, पोखरी, चिखली, जांभोरी, नंदरकिचीवाडी, फळोदे, तळेघर, राजपूर, गाडेवाडी, तेरूगण, निगडाळे या गावांतील सिंचनाला फायदा होणार असून सदरची गावे आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण परिसरातील १०० टक्के आदिवासी बहुल गावे असणे, कळमजाई शेती जलउपसा सिंचन परियोजना भिमाशंकर ही योजना त्वरित सुरू झाल्यास आदिवासी बांधवांना सामाजिक न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी मदत होणार असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(६) **डॉ. पंकज भोयर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“वर्धा जिल्ह्यात बोर व धाम हे सिंचनाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे प्रकल्प असणे, दोन्ही प्रकल्पांचा वर्धा जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना लाभ होत असणे, दोन्ही प्रकल्प

अप्रकाशित प्रत

जवळ जवळ ५० वर्षापेक्षा जास्त जुने असल्याने कालवे व वितरण प्रणाली जीर्ण झाली असणे, सदर प्रकल्पाची सिंचन क्षमता १६१९४ हे. असून देखील आज मितीस फक्त ११५८८ हे. पर्यंतच प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळत असणे, सदर कालवे जागोजागी फुटल्याचे निदर्शनास येणे, कालव्याचा प्रवाह विरुद्ध दिशेस होणे, शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असणे, कालवे प्रणाली जीर्ण झाल्यामुळे सिंचन क्षमता कमी झालेली असणे, कालव्यांची अस्तर प्रणाली जीर्ण झाल्यामुळे व गाळ साचल्यामुळे ४० टक्के पाणी पाझरात असणे, अस्तर प्रणालीची स्थिती बरोबर नसल्यामुळे पाण्याला शेवटपर्यंत जाण्यासाठी अडथळा येत असणे, त्यामुळे बरेचशे शेतकरी सिंचनापासून वंचित राहत असणे, यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असणे, करीता धरणातील गाळ काढणे आवश्यक असणे, धरणांची दुरुस्ती तसेच कालवे व वितरण प्रणालीची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, सदर प्रकल्पांतील पाणी सोडल्याने नदीकाठावरील बऱ्यांशा गावात पुराचे पाणी शिरत असणे, बऱ्यांच वेळा गावातील लोकांच्या घरांमध्ये पाणी शिरुन जिवीत व वित्त हानी होत असणे, प्रभावित गावांना सुरक्षित करण्याकरीता पुर संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक असणे, नदीपात्राचे खोलीकरण करणे आवश्यक असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत शासनाला वेळोवेळी निवेदनांद्वारे कळविण्यात येणे, सदर प्रकल्पांचे सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील मागाठाणे, बोरिवली येथील महाकाली गृहनिर्माण संस्था व देवीपाडा गृहनिर्माण संस्था हा प्रकल्प गेल्या कित्येक वर्षापासून पुनर्विकासापासून वंचित असून सर्व झोपडी-धारकांची घरे तोडण्यात येणे, तसेच या झोपडीधारकांना गेल्या कित्येक वर्षापासून भाडेही देण्यात न येणे, परिणामी झोपडीधारकांची आर्थिक ओढाताण होत असून करोना महामारीमुळे अत्यंत दयनीय अवस्था होणे, दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण भरणे अशक्य होत असल्याने आर्थिक विवंचनेतून दोन झोपडी धारकांनी आत्महत्या केली असून परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदरील प्रकल्प शासनाने हस्तांतरीत करुन नागरिकांना न्याय देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तत्कालिन गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे केलेली मागणी, शासनाने संबधित विकासकांवर कारवाई करुन संबधित झोपडीधारकांना भाडे देण्याचे आश्वासन देऊनही अदयापही संबधित विकासकांवर कारवाई करण्यात आली नाही तसेच झोपडीधारकांना भाडेही देण्यात आलेले नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(८) **श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये निर्माण झालेल्या अडचणी विषयी बैठक लावणेसाठी स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी विभागीय आयुक्त पुणे यांना दिनांक ९ सप्टेंबर, २०२१ रोजी विभागीय आयुक्त पुणे यांना पत्र देणे, परंतु सदर बैठकीचे आयोजन अद्याप पर्यंत न होणे. पुणे शहरात काशेवाडी, मंगळवार पेठ, लोहिया नगर, ताडीवाला रोड, नाना पेठ इत्यादी ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम चालू असणे. यापैकी बरेच प्रकल्प अर्धवट अवस्थेत असणे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करणाऱ्या विकसकांचे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या हितसंबंधा मुळे प्रत्यक्ष झोपडपट्टी धारकांची विकासकाकडून वेगवेगळ्या प्रकारे अडवणूक करणे व पात्र असणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना सुद्धा घरापासून वंचित राहावे लागणे प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये सदर प्रकल्पावर देखरेख व तांत्रिक तपासणी करण्यासाठी स्वतःचे योग्य ते मनुष्यबळ नसल्यामुळे सदर प्रकल्पाच्या बांधकामाची तांत्रिक दृष्ट्या तपासणी न होणे, लोहियानगर येथील झोपडपट्टी धारकांना बिबवेवाडी येथे तात्पुरती राहायची व्यवस्था केली असतानाही त्या ठिकाणी सदर झोपडपट्टीधारकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे व लोहियानगर येथे होत असलेल्या प्रकल्पाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडलेले असणे, त्यामुळे येथील रहिवाशांना स्वतःचे घर मिळण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागणे, नाना पेठेतील प्रकल्प पूर्ण झालेला असून तेथे लाभधारकांना मिळालेल्या घरांमध्ये कोणत्याही सोयी सुविधा नसणे ताडीवाला रोड येथील पानमळा प्रकल्पातील झोपडपट्टी धारकाला विकसक व अधिकाऱ्यांच्या असलेल्या संगनमतामुळे पात्र असूनही अनेक वर्ष हेलपाटे मारायला लावून ही अद्यापपर्यंत त्यांना स्वतःच्या हक्काचे घर न मिळणे, या सर्व गोष्टींची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व गरीब झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्यासाठी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **सर्वश्री. राजेश एकडे, बळवंत वानखडे, अमित झनक, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जिगाव प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्या अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील जिगाव गावाजवळ पूर्णा नदीवर प्रगतीपथावर असणे, प्रकल्पामध्ये १५ उपसा सिंचन योजना असणे, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव, शेगाव, जळगाव जामोद, संग्रामपूर, मलकापूर आणि नांदुरा या सहा तालुक्यातील २६८ गावातील व अकोला जिल्ह्यातील बाळापुर व तेल्हारा या दोन तालुक्यातील १९ गावातील असे एकूण ७८ हजार ५८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित असणे,

मलकापूर विधानसभा क्षेत्रातील नांदुरा तालुक्यामधील हा प्रकल्प असून सुद्धा नांदुरा तालुक्यातील १४ गावे लाभक्षेत्रापासून वंचित असल्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने सदर १४ गावांचा लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याबाबत माननीय मंत्री जलसंपदा यांना निवेदनाद्वारे विनंती करणे, १४ वंचित गावांचा लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात दिनांक ५ मे, २०२२ रोजी तात्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीमध्ये जिगाव प्रकल्पा अंतर्गत मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील १४ गावांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव तपासून नियमक मंडळाची मान्यता घेऊन शासनास तीन महिन्यात सादर करण्याबाबतचे आदेश तत्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांचे मार्फत देण्यात येणे, परंतु आज रोजी पर्यंत यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे १४ गावांतील शेतकरी व नागरिक यांच्यामध्ये शासनाप्रति असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जळगाव जिल्ह्यातील अमळनेरसह ५ तालुक्यांसाठी महत्त्वाचा असलेल्या निम्न तापी पाडळसे प्रकल्प गेल्या २५ वर्षांपासून रखडलेला असणे, १९९७-९८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रकल्प रखडल्यामुळे प्रकल्पाचा खर्च पाचपटीने वाढलेला असणे, प्रकल्प रखडल्यामुळे दरवर्षी १०,००० दशलक्ष घनमीटर पाणी वाहून जाणे, ४२० दशलक्ष घनमीटर क्षमतेचा हा प्रकल्प पूर्ण झाल्यास ५४९३६ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार असणे, पाडळसे प्रकल्प स्थळावर सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नसणे, २९ डिसेंबर, २०२२ रोजी वाळू, खडी, डबर, माती, डिझेल, डीपी, लोखंड अशा ५ लाख रुपयांच्या साहित्याची चोरी होणे, तत्कालीन युती सरकारने या प्रकल्पासाठी नाबार्ड कडून १५०० कोटी कर्ज उपलब्ध झाल्याची घोषणा करणे मात्र ती फसवी ठरणे, या प्रकल्पासाठी सन २०२०-२१ आणि २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात २०० हून अधिक कोटी रुपयांची तरतूद केलेली असणे, यातून किरकोळ कामे सुरू असणे मात्र धरणाच्या मुख्य पिलरचे काम अद्याप सुरू झालेले नसणे, सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असणे त्यासाठी ५३०० कोटी रुपये तरतूद करण्याची गरज, प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **श्री. रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ज्यांच्या मतदारसंघात निम्न

अग्रिम प्रत

पेढी प्रकल्प येतो त्या लोकप्रतिनिधीने दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंधारण मंत्री यांना पत्र देऊन निम्न पेढी प्रकल्प तालुका भातकुली जिल्हा अमरावती या प्रकल्पाला उमा बरेजः प्रकल्पाला जिल्हा अकोला ज्याप्रमाणे रुपये ०८:२६ लक्ष रूपये विशेष बाब म्हणून लागू केले, त्यानुषंगाने हे धोरण निम्न पेढी प्रकल्प या प्रकल्पास लागू करणे ही शासनाची धोरणात्मक बाब असून शासन स्तरावरील त्याबाबत निर्णय घेण्याबाबत पत्र दिले असणे, शासनाने ही बाब गांभीर्याने घेउन शासनाने संबंधित मागणी लक्षात घेता जलसंपदा विभाग या कार्यालयाचे व्हीआयपी पत्र क्रमांक २०२२/१९८/पत्र क्रं.३२८/मो प्र.-२/ दिनांक १४/१२/२०२२ रोजी च्या पत्रान्वये कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर, मुख्य अभियंता जलसंपदा विशेष प्रकल्प अमरावती व जिल्हाधिकारी अमरावती यांना वरील विषय प्रकरणी अहवाल मागवला असणे, कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्रमांक एक अमरावती यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक दिनांक २०/१२/२०२३ रोजीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पत्र पाठवून त्यांनी सदरची बाब ही जिल्हाधिकारी अमरावती यांचेमार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावे असे शासनाचे निर्देश असल्याने त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव निर्णयात्मक व पुढील कार्यवाहीकरीता जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सविनय सादर करण्यात आला असणे, परंतु अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी अमरावती व कार्यकारी संचालक कार्यालय, नागपूर यांच्याकडून सदर प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला नसणे, ज्यामुळे वारंवार निम्न पेढी प्रकल्प ग्रस्त शेतकरी यांनी संबंधित लोकप्रतिनिधी यांच्याकडे सातत्याने तगादा लावला असणे, सदर बाब ही निर्णयात्मक असल्याने तातडीने दोन्ही विभागाकडून प्रस्ताव प्राप्त करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाने निर्णयात्मक आदेश काढण्याची कार्यवाही यासंबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(१२) **श्री. समाधान अवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ इतकी असणे, त्यापैकी आदिवासी जमातीची लोकसंख्या ही १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असणे, म्हणजेच राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के आदिवासींची लोकसंख्या असणे, अनुसूचित जमातीच्या यादीत ४५ जमाती शासनाच्या सवलती पात्र असताना देखील प्रत्यक्षात १२ जमातींनाच याचा लाभ मिळत असणे, त्यामुळे इतर जमतींकडून आदिवासी मंत्रालय व त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केला जात असणे, राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ९.३५ टक्के निधीची तरतूद दरवर्षी केली जात असणे, राज्याच्या लोकसंख्येप्रमाणे आदिवासी समाजास राजकीय आरक्षण ९ टक्के दिले असणे, व शैक्षणिक आरक्षण ७ टक्के दिले असणे, परंतु पुणे, ठाणे, नाशिक, रायगड, अहमदनगर या पाच जिल्ह्यांतील ३८ तालुक्यांतील

आदिवासी जमातींना खरे आदिवासी समजून कोणतेही पुरावे न पाहता, दक्षता पथक न पाठवता, कोणतीही सखोल चौकशी न करता जात वैधता प्रमाणपत्र दिले जात असणे, उर्वरित महाराष्ट्राच्या विस्तारित क्षेत्रातील एकाही आदिवासी जमातीला जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीने न देता कितीही पुरावे दिले तरी जात पडताळणी प्रमाणपत्र देताना वेगवेगळ्या पुराव्याची माहिती मागवून अडवणूक केली असणे,विशेषतः सोलापूर जिल्ह्यासहित  संपूर्ण राज्यातील महादेव कोळी,मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी,डोंगर कोळी ह्या सर्व जमाती आदिवासी समाजात मोडत असताना त्यांची वारंवार अडवणूक होत असणे, पडताळणी समितीच्या निर्णयाच्या विरोधात जे लोक मा.उच्च न्यायालयात  जातात, त्यांना मात्र जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जातवैधता प्रमाणपत्र देत असणे, एकट्या सोलापूर जिल्ह्यात  महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी,डोंगर कोळी लोकसंख्या ७७ हजार ५१३ इतकी असून यापैकी १०० लोकांनाही जातवैधता प्रमाणपत्र अद्याप  दिलेले नसणे, यामुळे आदिवासी असून देखील या जमातींना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित रहावे लागत असणे, तसेच याचा फटका त्यांना राजकीय, शासकीय नोकऱ्या व शैक्षणिक, व अनेक शासकीय योजनांचा लाभ घेताना बसत असणे, यामुळे एकूण लोकसंख्येच्या ५.०४% म्हणजेच तब्बल ६१३८२०६ इतक्या लोकांमध्ये शासन व प्रशासन विषयी असंतोषाची भावना निर्माण होत असणे,याबाबत शासनाने ह्या जमातींना जात वैधता प्रमाणपत्र व इतर सर्व योजनांचा विनासायास लाभ देण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(१३) **श्री. जयकुमार रावल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगांव आणि नंदूरबार हे तिन्ही जिल्हे विकासाच्या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कितीतरी पटीने मागे असणे, तिन्ही जिल्हयात सिंचनाचा मोठा अनुशेष असणे, नाशिक महसुल मंडळ आणि खान्देश महसुल मंडळ २ स्वतंत्र महसुल मंडळ करून नाशिक जिल्हयातील मालेगांव जिल्हा निर्मितीचा प्रश्न मार्गी लावून हिंदू हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची घोष्णा प्रत्यक्षात साकार करण्याची निर्माण झालेली गरज, नविन मालेगांव तालुक्यात मनमाड, नांदगाव, नामपूर, तर धुळे जिल्हयातील दोंडाईचा पिंपळनेर असे विविध तालुक्यांच्या निर्मितीचा विषयही अनेक वर्षापासुन प्रलंबित असणे, यासाठी नाशिक महसुल मंडळाचे विभाजन करून अमरावती महसुल मंडळाच्या धर्तीवर खान्देशातील धुळे, नंदूरबार आणि जळगांव जिल्हयाचे स्वतंत्र महसुल मंडळ करण्याची मा.मुख्यमंत्री यांनी माहे फेबुवारी, २०२३ मध्ये केलेली घोषणा, त्यामुळे जनतेच्या मनात नविन आशा पल्लवित होणे, यासाठी तिन्ही जिल्हयाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या धुळे जिल्हयात महसुल मंडळाचे मुख्यालय करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

अग्रिम प्रत

(१४) **श्री. अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अहमदनगर शहरामध्ये स्थित दो बोटी चीरा मस्जिद जी एतिहासिक आहे व सदर मस्जिद नोंदणीकृत असणे, शहराच्या मधोमध असून मस्जीदीमध्ये न्यायालय असणे, न्यायालयाकरिता नवीन इमारत बांधून तेथे न्यायालयाचे स्थलांतर करूनही अद्यापर्यंत सदरची जागा मस्जीदिच्या संस्थेला देण्यात न येणे, हुसैनी मस्जिद, दो बोटी चिरा मस्जिद यांच्यामध्ये ५० फुटाचे अंतर असणे, सदर मस्जीदीच्या मध्ये अहमदनगर कोतवाली पोलीस स्टेशन चालविण्यात येणे, तसेच याच वक्फच्या जागेवर नवीन कोतवाली पोलीस स्टेशन बनविण्यात येणे व अद्यापपर्यंत जुन्या मस्जीदीचा ताबा देण्यात न येणे, हातमपुरा अहमदनगर मधील बाबा बंगाली दरगाह जवळ २२ क्रमांकाची मस्जीदीच्या जागेवर जुने जिल्हाधिकारी कार्यालय बनविण्यात आलेले असणे, नवी इमारत बनून हि सदरची जागा अद्यापपर्यंत मस्जीदिच्या ताब्यात न देणे, तारकपूर, अहमदनगर मधील रुमी खान मस्जिद आणि दरगाह च्या जागेवर शहरामधील काही ताकतवर नेत्यांनी कब्जा केलेला असून सदर जागेवर कोणालाही येण्या-जाण्यास मनाई करण्यात येणे, सदर विषयी शासनाकडे वारंवार संबंधितावर कारवाई करून सदर ची जागा संबंधित संस्थांना देण्यात यावी अशी मागणी करूनही कोणतीही कारवाई करण्यात न येणे, सदर विषयी जनसामान्यांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१५) **श्री. सुनिल शेळके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाविरोधात दिनांक ९ ऑगस्ट, २०११ रोजी मावळ तालुक्यातील बऊर येथे स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन होऊन सदर प्रकल्पास प्रचंड विरोध व्यक्त होणे, या आंदोलनादरम्यान पोलीस प्रशासनाकडून आंदोलकांवर बेछूट गोळीबार होऊन यामध्ये ३ व्यक्ती आंदोलन स्थळी मृत पावल्या असून १२ आंदोलक जखमी होण्याची दुर्दैवी घटना घडलेली असणे, या घटनेचे देशभरात तीव्र प्रतिसाद उमटणे, सदर मृतांच्या वारसांना व जखमींना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्याचे आश्वासन शासनातर्फे देण्याचे जाहीर होणे, परंतु या घटनेला ११ वर्षे पूर्ण होऊनही आंदोलनातील जखमींना अद्याप नोकरी मिळालेली नसणे, आंदोलनात सहभागी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेऊन सदर जलवाहिनी प्रकल्पाला स्थगिती दिलेली असून यावर कोणताही ठोस निर्णय अद्याप झालेला नसणे, सदर आंदोलनातील जखमींना नोकरी देण्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे व स्थायी सभेत सर्वानुमते संमत केलेला ठराव पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठविलेला असणे, यावर तत्कालीन

मा.उपमुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये सदर विषयावर बैठक आयोजित होऊन बैठकीमध्ये मा.उपमुख्यमंत्री यांनी सकारात्मक अहवाल सादर करावा असे नगरविकास विभागाला निदेश देऊनही सदर प्रस्ताव शासन स्तरावर बराच काळ प्रलंबित राहून अखेर नामंजूर होणे, यामुळे जखमी शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाविषयी तीव्र संताप निर्माण होऊन सर्वसामान्य जनतेमध्ये शासनाविरोधी पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(१६) **सर्वश्री. शेखर निकम, निलेश लंके, कुमारी आदिती तटकरे, सर्वश्री. अतुल बेनके, यशवंत माने, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“खेळे / नमन व जाखडी हा प्रसिध्द कलाप्रकार कोकणामध्ये प्रसिध्द असून अनेक वर्ष या कलाप्रकाराच्या माध्यमातून अनेक कलावंत आपली कला प्रदर्शित करुन मनोरंजन व प्रबोधन करण्याचे काम करत असणे, बदलत्या कालानुसार खेळे/नमन व जाखडी यासारखे अभिजात कोकणी कलाप्रकार काळाच्या ओघात गडप होण्याचा धोका संभवत असणे, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये लोककला अभिजात संस्कृतीचे दर्शन अखिल जगाला घडवितात त्या कला संपूष्टात येऊ नयेत, बदलत्या काळाशी स्पर्धा करत त्यांना तग धरता यावा तसेच सांस्कृतिक व पारंपारीक कलेची लोकांना माहिती व्हावी आणि त्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्यात नाट्यसंगीत, नाट्य, चित्रपट, तमाशा फड, हंगामी तमाशा फड, लावणी कलापथक, दशावतार मंडळ, खडीगंमत कलापथक व शाहिरी पथके इत्यादिना यासाठी शासन निर्णय क्रमांक लोक. अ. २००७/ प्र.क्र.१२७/ सां.कां.३, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२, दिनांक ०१/०१/२००८ नुसार शासनाने अनुदान पॅकेज जाहीर असणे, याधर्तीवर मध्य कोकणातील या पारंपारीक व सांस्कृतिक कलाप्रकारांना देखील उर्जितावस्था देणे, त्या टिकवून ठेवण्याकीरता अनुदान आणि कलाकार पेन्शन योजना शासन लागू करणेबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही.”

(१७) **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“केंद्र व राज्य शासनाने कांदळवनाबाबत आपली भुमिका स्पष्ट केलेली असून पर्यावरणाची हानी होऊ नये याकरिता ज्या ठिकाणी कांदळवने असतील त्या ठिकाणी त्यांचे रक्षण करणे व जतन करणे याची जबाबदारी वन खाते व पर्यावरण खात्यामार्फत केंद्र व राज्य शासन करीत असणे, परंतू, काही ठिकाणी कांदळवनाचे संरक्षण होत असल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात विकास कामे करीत असताना फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असणे, कारण त्यातील काही कांदळवनांची सिमा निश्चित

अग्रिम प्रत

केल्यानंतर पावसाळ्यामध्ये, अवकाळी पावसामुळे अथवा सुसाट्याच्या वाऱ्यामुळे कांदळवनाच्या बिया शेतकरी शेती करीत असलेल्या शेताच्या काही भागामध्ये पसरल्यामुळे त्या ठिकाणी कांदळवनाची फार मोठ्या प्रमाणात वाढ असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करताना मोठ्या प्रमाणात अड्चणींना सामोरे जावे लागत असणे, त्याचबरोबर काही कच्च्या रस्त्यावर व अविकसित भुखंडावर या बिया गेल्यामुळे शासनाच्या कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे सदरचा भुखंड विकसित होऊ शकत नसणे, अथवा रस्त्यांचे रूंदीकरणही होऊ शकत नसणे, तसेच ज्या भुखंडावर ही कांदळवने पसरली जातात त्या भुखंडधारकांना भुखंडाचा मोबदला हा टी.डी.आर. च्या स्वरूपात अथवा आर्थिक स्वरूपात मिळण्यासाठी देखील अड्चणी निर्माण होत असणे, माझ्या ओवळा - माजिवडा विधानसभा मतदारसंघातील कांदळवनाच्या बाबतीत विचार केला तर मेट्रो-४ व मेट्रो-९ चे काम असो अथवा घोडबंदर किल्याशेजारी शिवसृष्टी उभारणीचे काम असो, त्याचबरोबर दहिसर-भाईंदर कोस्टल रोडचे काम असो अथवा गायमुख - कोलशेत कोस्टल रोडचे काम, एम.एम.आर.डी.ए. करीत असलेल्या घोडबंदर जेसलपार्क चौपाटी या ६० मिटर रस्त्याचे काम असो अथवा नागला बंदर व घोडबंदर खाडी किनारा विकसित करण्याचे काम, सुभाषचंद्र बोस मैदान विकसित करण्याचे काम असो अथवा घोडबंदर परिसरातील जेट्टीचे काम या सर्व विकास कामांना कांदळवनाच्या कडक नियमावलीमुळे फार मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होणे, यावर उपाययोजना म्हणून शहरी भागातील या कांदळवनाची पुर्वीची सिमा रेषा निश्चित करून या कांदळवनांची वाढ भविष्यामध्ये विकास कामांवर परिणाम होऊ देऊ नये तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये किंवा भुखंड मालकांच्या खासगी भुखंडावर ही कांदळवने निर्माण झालेली आहेत त्यांना इतर शेतकऱ्यांप्रमाणे व इतर खाजगी भुखंड मालकांप्रमाणे आर्थिक व टी.डी.आर. स्वरूपातील मोबदला देण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(१८) **डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मुंबई वर्सोवा येथील वर्सोवा खाडीमध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचलेला असणे, तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी वर्सोवा खाडीतील गाळ काढण्यास ४.०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन गाळ काढण्यात येणे परंतु अंदाजे ५५ ते ६० लाख क्युबिक मीटर गाळ काढायचा राहिलेला असून सदर गाळामुळे मच्छीमाऱ्यांना मासेमारी करणे कठीण जात असून बोटींच्या होणाऱ्या अपघातामुळे त्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असणे, त्यामुळे सदरचा गाळ नियमित काढणे महत्वाचे असून वर्सोवा खाडीतील उर्वरीत गाळ लवकरात लवकर काढण्याबाबत तसेच त्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(१९) **श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात नाशिकच्या उद्योजकाकडून मागील दोन वर्षापासून वसूल करण्यात येत असलेल्या दुहेरी फायर सेस तात्काळ बंद करण्याचे निर्देश मा. उद्योग मंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यात सुमारास देणे, नाशिक जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर मा.उद्योग मंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक होऊन विविध समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन उद्योग मंत्री महोदयांनी देऊन दोन महिन्याचा कालावधी होऊन गेला तरी या बैठकीत दिलेल्या आश्वासनाची प्रशासनाने अद्याप पर्यंत अंमलबजावणी न केल्याने नाशिक येथील उद्योजक आर्थिक अडचणीत येत असणे, अंबडचे फायर स्टेशन महापालिकेकडे हस्तांतरित करणे आठवड्याभरात पोलीस स्टेशन सुरू करणे, पावर प्रोजेक्ट वगळता इतर जमीन परत घेण्यासाठी कायदेशीर बाबी तपासण्याचे निर्देश देणे, बंद जकात नाक्याजवळ औद्योगिक वसाहतीत सीईटीपी प्रकल्प उभारणे, सोलार धोरण कायम ठेवावे, चांगल्या वीज पुरवठ्यासाठी महावितरण सुविधा द्याव्यात, सातपूर अंबड मध्ये ड्रेनेजसाठी अमृत दोन योजनेतून पालिकेने प्रस्ताव द्यावा, वर्गणीला पायबंध घालणारे निर्भया धोरण राबविण्यात यावे, आधी मागण्यांचा वापर झालेला असणे, त्याचबरोबर मा.उद्योग मंत्री महोदया बरोबर झालेल्या बैठकीत इतर मागण्यांच्या ही तात्काळ मंजूर करून उद्योजकांना दुहेरी फायर सेस पासून मुक्ती देण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२०) **डॉ. राहूल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"परभणी महानगरपालिकेंतर्गत २०१८ मध्ये १००० आसन क्षमतेच्या नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकास कामांना नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, सदर कामासाठी मार्च, २०१८ मध्ये १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे, सद्यःस्थितीत निधी अभावी सदर नाट्यगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असणे, नाट्यगृहाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्यासाठी अजून ११ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असणे, या नवीन नाट्यग्रह बांधकामासाठी वाढीव ११ कोटी ७५ लाख रुपये निधीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १६/०६/२०२२ रोजी परभणी महानगरपालिकेने शासनास सादर केलेला असणे, सदर वाढीव निधीस मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ०२/११/२०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत निधी मंजूर न होणे, परिणामी सदर नाट्यगृहाचे काम अद्यापही निधी अभावी

अग्रिम प्रत

रखडलेले असणे, त्यामुळे जिल्ह्यातील व परिसरातील कलावंताची होणारी फरफट, शासनाने परभणी येथील १००० आसन क्षमतेच्या मंजूर नवीन नाट्यगृहाचे काम पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेला निधी तात्काळ मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२१) **श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

''सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी उजनी धरण जलाशय उदभव धरून पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आलेली असणे सदर योजनेद्वारे सोलापूर शहरास दररोज १७० द.ल.ली पाणी उपलब्ध होणार असणे सदर योजनेत मुख्यत्वे धरण क्षेत्रात जँकवेल बांधणे, पंपींग स्टेशन व पंपींग मशीनरी,रायझिंग मेन, बी.पी.टी. ग्रँवीटी मेन इ. कामांचा समावेश असणे, सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (उजनी धरण उभ्दव-१७० द.ल.ली.क्षमता) असणे, लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग सर्विसेस प्र.लि. कोल्हापूर यांना दि.२७.१०.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले होते परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२४.११.२०२२ रोजी जागेवरील काम थांबविण्याबाबत आदेश दिलेले असणे तसेच मागील ठेकेदार पोचमपाड कंपनी यांनी उर्वरित काम रु.६१५ कोटी मध्ये करण्यास इच्छुक असलेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर सिटी डेव्हलमेंट कार्पोरेशन लि. यांच्याकडे दि.५.१२.२०२२ पत्रांनी कळविले असून याबाबत दि. १५.१२.२०२२ रोजीच्या ३२ वी संचालक मंडळाची बैठकीमध्ये कायदेशीर मत घेणेबाबत ठरले, तसेच तो पर्यत ठेकेदार लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग सर्विसेस प्र.लि. यांना काम थांबविण्याचे निर्देश दिलेले असणे, कामाच्या अंमलबजावणी दरम्यान, कोविड परिस्थितीच्या  प्रभावामुळे स्टील, सिमेंट आणि इंधनाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे कंत्राटदाराने काम सुरु  ठेवण्यास असमर्थता दर्शविली, त्यामुळे, निविदेमध्ये कलमाचा समावेश न केल्यामुळे, दि.११.११.२०२१ रोजी सोलापूर स्मार्ट सिटीच्या २७ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत करार संपुष्टात आणण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, दि.२९.१२.२०२१ रोजी सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉँपोरेशन लिमिटेडद्वारे कंत्राटदाराला अंतिम समाप्तीची नोटीस बजावण्यात येणे, याप्रकरणी ठेकेदार लवादाकडे गेलेले असणे, पुणे येथे लवादाची प्रक्रिया सुरु असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(२२) **श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कर्नाटक राज्याला वीज निर्मितीसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील बरांज मोकासा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करून कोळसा उत्खननाकरिता देण्यात येणे, सन

२००८ मध्ये बरांज मोकासा, चेक बरांज, कढोली, किलोनी, चीचोर्डी, सोमनाला व अन्य अश्या ७ गावच्या शेतकऱ्यांच्या १४५७.६० हेक्टर आर (अंदाजे ३६००.३२ एकर) जमिनीचे भुसंपादन करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी प्रत्येक शेतकऱ्यांना जमिनीचा ५० % आर्थिक मोबदला अदा करण्यात आला असून उर्वरित ५० % आर्थिक मोबदला मागील १४ वर्षापासून कर्नाटका पावर कॉर्पोरेशन तर्फे अद्यापही शेतकऱ्यांना देण्यात आलेला नसणे, **KPCL** तर्फे कोळसा उत्खनन केल्यानंतर शेतकऱ्यांची शेती कसदार करून त्यांना परत करण्याच्या अटी व शर्तीसह करार करण्यात आले असणे, तसे **R & R policy -** २०१६ बिंदू क्र. २.६ मध्ये नमूद असणे, परंतु मागील १४ वर्षात कोळसा उत्खनन करूनही अद्यापही पिडीत शेतकऱ्यांना शेती सुधारणा करून शेतीजमीन करारानुसार परत न देणे, सदर करारनामा मध्ये तांत्रिक शब्दाचा वापर करून बरांज व अन्य ७ गावच्या शेतकऱ्यांचे अंदाजित १४७ कोटी रुपये मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे प्रकल्पग्रस्त पिडीत शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देण्याकरिता जमा केलेला नसणे, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची **KPCL** कंपनीकडून आर्थिक फसवणूक करण्यात येत असणे, **KPCL** कंपनी तर्फे शेतकऱ्यांचे ५० % जमिनीचा आर्थिक मोबदला अदा न केल्याने आणि करारानुसार जमीन परत न करत असल्याने जिल्हा चंद्रपूर ता.भद्रावती येथील बरांज मोकासा कोळसा खाण करिता शेतकऱ्यांची अधिग्रहित १४५७.६० हेक्टर आर जमिनीचे सर्व फेरफार रद्द करण्यात यावेत अथवा संपूर्ण शेतकऱ्यांचे सद्यस्थितीत बाजार मूल्य नुसार नवीन दराने ५० % जमिनीचा आर्थिक मोबदला व्याजासह मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :**

**सर्वश्री. छगन भुजबळ, अजित पवार, बाळासाहेब थोरात, नानाभाऊ पटोले, कु. आदिती तटकरे, श्री.दत्तात्रय भरणे, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"दिनांक ७ जानेवारी २०२३ रोजी बिहारमध्ये स्वतंत्रपणे जातनिहाय जनगणना करण्याचे काम सुरु करण्यात आलेले असणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सुध्दा शासनामार्फत ओबीसी जनगणना करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०२२, दिनांक १० नोव्हेंबर, २०२२, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ व दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे वारंवार केलेली मागणी, मात्र याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत निर्णय घेण्यात न येणे, ओबीसी प्रवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी ओबीसींची जनगणना करण्याची आवश्यकता, देशातील अनुसुचित जाती व जमातींची जातवार जनगणना गेल्या दीडशे वर्षापासून होत आलेली असणे, त्या माहितीच्या आधारे या वर्गाच्या विकास योजना, कल्याणकारी कार्यक्रम आणि आर्थिक तरतुद केली जात असणे,

अग्रिम प्रत

नागरिकांचा मागासवर्ग म्हणजेच ओबीसी, भटके विमुक्त व विमाप्र यांच्यासाठी मंडल आयोगाने १९८० मध्ये केलेल्या शिफारशींनुसार देशात हा तिसरा मागासवर्ग अस्तित्वात आलेला असणे, मात्र त्याला घटनात्मक संरक्षण पुरविताना दरवेळी जनगणना नसल्याने लोकसंख्या माहित नसल्याचे कारण पुढे केल जात असणे, पहिल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने (कालेलकर कमिशन) १९५५ साली स्वतंत्र ओबीसी जनगणनेची मागणी केलेली असणे, १९८० साली दुसऱ्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने म्हणजेच मंडल आयोगाने स्वतंत्र ओबीसी जनगणनेची पुन्हा शिफारस केलेली असणे, १९९४ साली केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने ओबीसी जनगणना कशी आवश्यक आहे ते सरकारला तिसऱ्यांदा पटवून दिलेले असणे, दिनांक ५ मे, २०१० रोजी संसदेत १०० खासदारांनी ओबीसी जनगणनेचा ठराव केलेला असणे, सन २०११ ते २०१४ मध्ये सामाजिक व आर्थिक जनगणना (SECC 2011) करण्यात आलेली असणे, मात्र ही आकडेवारी केंद्र सरकारने जाहीर केलेली नसणे, राष्ट्रीय विकास परिषदेने व केंद्रीय नियोजन आयोगाने ओबीसीचे शिक्षण, रोजगार, निवारा, आरोग्य यासाठी धोरणे आखण्यासाठी ओबीसी जनगणना करावी असा ठराव केलेला असणे, संसदेच्या सामाजिक न्याय विभागाच्या स्थायी समितीने ओबीसी जनगणनेची शिफारस केलेली असणे, ओबीसी जनगणनेबाबत तत्कालीन मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी विधानसभेत ठराव मांडून तो सर्वानुमते मंजुर करण्यात येणे, मात्र केंद्र शासनाने जातीनिहाय जनगणना करण्यासाठी असमर्थता व्यक्त केल्यामुळे राज्य शासनाकडून जातीनिहाय जनगणना करण्याची आवश्यकता, शेकडो परिषदा, संस्था, संघटना ओबीसी जनगणनेचा आग्रह करीत असणे, जोवर ओबीसी जनगणना नाही तोवर या मागास समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आणि योजना बनविण्याकरिता निधीचे नियोजन करता येणार नसणे, मुख्य प्रश्न विकासाचा असणे, तो ओबीसींचा घटनात्मक हक्क आहे तो नाकारून सरकार शतकानुशतके मागास राहिलेल्या या कारागिर वर्गाला [बलुतेदार-अलुतेदारांना] शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा नाकारीत असणे, त्यामुळे ओबीसी आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनीही मागासच असणे, बिहार तसेच तामिळनाडू सारख्या राज्यांनीही जातनिहाय जनगणना हाती घेतलेली असणे, त्यामुळे हे राज्य आज देशात मानव विकास निर्देशांकात प्रथम क्रमांकावर असणे, सन २०२१ सालची नियमित जनगणना राज्य शासनाचे अधिकारी आणि कर्मचारी करणार असून शासनाची जातनिहाय जनगणना या जनगणनेच्या वेळीच सदर यंत्रणेकडून एकत्रितपणे करता येणे सहज शक्य असणे, त्यामुळे राज्य शासनामार्फत ओबीसी जनगणना करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ** :-

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती आदिती तटकरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अमुद्रित प्रत

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अमित झनक, संग्राम थोपटे, संजय जगताप, विकास ठाकरे, शिरीषदादा चौधरी, अमिन पटेल, डॉ.नितीन राऊत व श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, धनंजय मुंडे व अनिल पाटील वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(झ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

अग्रिम प्रत

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ट) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

अस्वाक्षरित प्रत

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **ॲड. आशिष शेलार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, सदा सरवणकर, अमित साटम, भरतशेठ गोगावले, अतुल भातखळकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री कालीदास कोळंबकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, गणेश नाईक, नितेश राणे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, प्रशांत ठाकूर, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, माधुरी मिसाळ, सर्वश्री महेश चौघुले, मिहीर कोटेचा, राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय केळकर, सुनील राणे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, चिमणराव पाटील, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, योगेश कदम, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भुमिपूजन होऊन कामही सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी. रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची ६ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन मा.पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे

३०० कि.मी. मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्दयामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पुर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणाबाबत शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांच्या पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची

अप्रमाणित प्रत

आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महापालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस रोडावल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महापालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

नऊ : **सर्वश्री. अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, विनोद निकोले, रईस शेख, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम,**

अप्रकाशित प्रत

**दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील (सडोलीकर), विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे-पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री. माधवराव पवार, धिरज देशमुख, रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वत:कडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे निवडणुका दीर्घकाळ रखडल्या असणे, राज्यातील महानगरपालिकांत, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करुन निधीची उधळपट्टी होत असणे, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईत विनापरवाना पाणी उपसा करुन होणारी विक्री, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, मुंबईतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, विक्रोळी कन्नमवार नगर येथील ३८ सोसायट्यांच्या पुनर्विकासातील अडथळा दूर करण्याची गरज, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिंडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेल्या अनियमितता, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत झालेला घोटाळा, आपला दवाखान्यांमध्ये असलेला औषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गोखले ब्रीजच्या पाडकामामुळे मुंबईच्या पश्चिम उपनगरात वाहतूकीचा उडालेला बोजवारा, मुंबईत वाढलेले धुळीचे साम्राज्य व प्रदूषण, सफाई कामगारांच्या आश्रय योजनेत निर्माण झालेल्या समस्या, महारेराने ५१ टक्के खरेदीदारांच्या मंजुरीची अट काढून टाकण्याचा घेतलेला धक्कादायक निर्णय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, ठाणे

महानगरपालिकेतील मग्रुर व मस्तवाल सहाय्यक आयुक्तांचे गँगस्टरशी असलेले संबंध त्यात त्यांनी अनेक बेकायदेशीर कामे केली असल्याचे तसेच गुंडाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना धमकावत असल्याचे उघडकीस येणे, ठाण्यातील समूह पुनर्विकास योजनेची घोषणा झाली असली तरी अंमलबजावणी होत नसणे, ठाणे शहर सार्वजनिक परिवहन सेवा मोडकळीस आली असणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, नवी मुंबईतील भूमीपुत्रांनी बांधलेली घरे नियमित करण्याचा रखडलेला निर्णय, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे, पुणे महानगरपालिकेत विकासकांचा वाजलेला बोजवारा, मेट्रो सेवेचे विस्तारीकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचा आराखडा, रिंग रोडचे भूसंपादन, यात होत असलेला विलंब, विविध महापालिकांतून वगळलेल्या गावांच्या विकासाचा निर्माण झालेला प्रश्न, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अस्वीकृत प्रत

**(शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

दहा : **श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. भरतशेठ गोगावले, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री चिमणराव पाटील, भिमराव तापकीर, अनिल बाबर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री महेश लांडगे, प्रताप सरनाईक, सिध्दार्थ शिरोळे, ज्ञानराज चौगुले, श्रीमती सीमा हिरे, श्री प्रशांत बंब, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, ॲड. शहाजीबापू पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल कांबळे, प्रकाश आबिटकर, सुहास कांदे, ॲड. राहूल कुल, डॉ. राहूल आहेर, डॉ. संजय रायमुलकर, श्री संजय गायकवाड, सर्वश्रीमती श्वेता महाले, अश्विनी जगताप, सर्वश्री महेश शिंदे, रमेश**

**बोरनारे, रणधीर सावरकर, दिलीप बोरसे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, समीर कुणावार, डॉ. पंकज भोयर, श्री योगेश कदम, श्रीमती लता सोनावणे, सर्वश्री बबनराव लोणीकर, संजय सावकारे, हरिभाऊ बागडे, किसन कथोरे, संजय केळकर, दिलीप लांडे, सदा सरवणकर, मंगेश चव्हाण, नितेश राणे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, योगेश सागर, सुनिल राणे, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर सर्वश्री अभिमन्यु पवार, राणाजगजीतसिंह पाटील, रवि राणा, सुभाष देशमुख, प्रकाश आवाडे, रत्नाकर गुट्टे, महेश बालदी, राम सातपुते, समाधान अवताडे, जयकुमार गोरे, नामदेव ससाणे, अमित साटम, गणपत गायकवाड, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री मिहीर कोटेचा, राजेश पवार, लक्ष्मण पवार, विजयकुमार देशमुख, डॉ. विनय कोरे, सर्वश्री संभाजी पाटील-निलंगेकर, सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील पुणे व नाशिक ही शहरे व्यापारी केंद्र असल्याने मुंबई, नागपूर, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राशी जोडलेली असणे, या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता स्वतंत्र विकास आराखडा तयार असणे मात्र त्यादृष्टीने शासनाकडून विकासात्मक कार्यवाही गतीमान करण्याची आवश्यकता असणे, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता असणे, पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिकेतील ३४ गावांचा सीटीसर्व्हे करुन विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबध्द व कालबध्द आराखडा तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने विचार करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते डेक्कन आणि हिंजवडी ते कात्रज मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी मुंबई-बेंगलोर महामार्गावरील स्वामी नारायण मंदिर ते नरे जंक्शन उड्डाणपुल करण्याची आवश्यकता, हवेली तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची आवश्यकता, जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असणे, सन २०२७ मध्ये नाशिक शहरात होणाऱ्या कुंभमेळयाच्या दृष्टीने आवश्यक तयारी आतापासून करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतिमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी घरे विकसित करण्याची व नाशिकमधील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, परराज्यातुन येणारे उद्योग नाशिक शहरात आणण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता, पुणे व नाशिक येथील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन पुर्नविकास करण्याची आवश्यकता असून सहकार अधिनियमातील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता असणे, पुणे व नाशिक येथील वाहतुक समस्या दिवसेदिवस वाढत असल्याने व प्रवाशांना तासनतास रस्त्यावर खोळंबुन रहावे लागत असल्याने यावर तोडगा

अग्रिम प्रत

काढण्याकरिता वाहतुक समस्येचा अभ्यास करुन वाहतुक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहराचे डीपी प्लॅन नव्याने तयार करण्याची आवश्यकता, कॅन्टोनमेन्ट एरिया पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने सुरु असलेली कार्यवाही अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्टीची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे-नाशिक रेल्वेची सुविधा करण्याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करुन पाठपुरावा करण्याची आवश्यकता, राज्यात दारु व दुध भेसळीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने सबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने अन्य भेसळ अधिनियमातील शिक्षेची तरतूद कठोर करण्याची आवश्यकता, केंद्राने सहकाराला बळकटी देण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नाला राज्य व केंद्र शासनाने परस्पर सामंजस्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता, राज्यातील बंद पडत असलेल्या सहकारी बँका, कृषी सहकारी संस्था यांना बळकटी देऊन उर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता, प्रायमरी अँग्री क्रेडीट सोसायट्या गावपातळीवर काढण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात जलदगतीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना पाठबळ देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण संस्थांच्या स्वयं पुनर्विकासासंबंधात स्वतंत्र धोरण आणण्याची आवश्यकता, राज्यातील सहकारी चळवळ बळकट करण्याची व पतपेढयांमधील ५ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याची आवश्यकता, राज्यातील प्रगत शिक्षण संस्थापैकी काही संस्था राजकीय अड्डे बनले असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा विपरीत परिणाम, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**अकरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :**

**सर्वश्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, हसन मुश्रीफ, अनिल देशमुख, अबू आजमी, विनोद निकोले, रईस शेख, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कु. प्रणिती**

**शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री सुनिल राऊत, कु. आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील, विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री माधवराव पवार, धिरज देशमुख, रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारे हल्ले व सुडबुध्दीने होणारी कारवाई, राज्यात संचार आणि विचार स्वातंत्र्याचा होत असलेला संकोच, पत्रकारांची झालेली हत्या, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यात सरकारला आलेले अपयश, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, शक्ती कायद्याची रखडलेली अंमलबजावणी, हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आलेले अपयश, मोठ्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली दादागिरी, गँगस्टरशी संबंध असलेल्या ठाणे महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्तावर पोलिसी कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई झाली असणे, राज्यात लोकप्रतिनिधी व खाजगी व्यक्तींकडून झालेला गोळीबार, जनतेतून तीव्र विरोध होत असल्याने आंतरधर्मिय समिती बरखास्त करण्याची आवश्यकता, सरकारने कॉपीमुक्त अभियानाची घोषणा केली असली तरी दहावी व बारावी परिक्षेत मोठ्याप्रमाणावर कॉपी व प्रश्नपत्रिका फोडण्याचे उघडकीस आलेले प्रकार, खंडणी टोळ्या सक्रीय झाल्याने उद्योजक, व्यावसायिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, बालविवाहाला प्रतिबंध घालण्यात सरकारला येत असलेले अपयश, छत्रपती संभाजीनगरमध्ये कोयता गँगची पसरलेली दहशत, आंतरधर्मिय कुटुंबात घरगुती

हिंसाचाराला वेगळे स्वरुप दिले जात असल्याने सामाजिक अशांतता निर्माण झाली असणे, नामांतर वादातून समाजभावना भडकावण्याचा होत असलेला प्रयत्न, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, तसेच, राज्यात येणारी परकीय गुंतवणूक, उद्योग, शासकीय आस्थापना परराज्यात जाण्याचे न थांबलेले सत्र, अन्य राज्यांच्या तुलनेत विजेचे दर जास्त असल्याने राज्याच्या उद्योग क्षेत्रावर झालेले परिणाम, लघू व मध्यम उद्योग वाढीसाठी सुयोग्य वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता, तसेच, राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणे उघडकीस येऊनही सरकार चौकशी करण्याबाबत सकारात्मक नसणे, हिदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाच्या कामात हजारो कोटी रुपयांच्या उघडकीस आलेल्या गौण खनिज घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मदतकार्ये व पुनर्वसन विभागात आपत्कालीन कामाच्या नावाखाली झालेला ७७०० कोटींच्या कामाचा घोटाळा, जळगावातील कुबेर ऑनलाईन मटका रॅकेट, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारी उपायुक्त व अतिरिक्त आयुक्तांना सेवेत घेऊन कार्यकारी पदावर केलेली नेमणूक, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## " राष्ट्रगीत "

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा